जा.क्र.कबचौउमवि/११ए/प्रशिक्षण /59/२०२१ दिनांक:- ०८/०७/२०२१

प्रति,
कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
असलेल्या सर्व महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे मा. प्राचार्य/संचालक आणि
विद्यापीठ परिसरातील प्रशाळांचे मा. संचालक यांना

विषय :- UPSC CIVIL SERVICE चे मोफत प्रशिक्षणाबाबत..
संदर्भ:- आदरणीय श्री. उदय सामंत, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्याकडील पत्र क्र.मंत्री/उ.व.तं.शि./टिप्पणी/४८०/२०२१, दि.२९ जुन, २०२१.

**महोदय/महोदया,**

आदरणीय श्री. उदय सामंत, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील वरील विषयाचे संदर्भीय पत्र ई-मेलव्दारे विद्यापीठास प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात नमुद केले आहे की, केंद्रीय लोकसेवा आयोगाकडुन (नागरी सेवा) घेण्यात येणा-या परिक्षेसाठी राज्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा हा दृष्टीकोन ठेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्यामध्ये सहा Pre -IAS प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. त्याअनुषंगाने शिवविद्या प्रबोधिनी पब्लिक ट्रस्ट, बाळासाहेब ठाकरे आयएएस अकॅडमी येथे एका वर्षाच्या कालावधीमध्ये १००० विद्यार्थ्याना मोफत प्रशिक्षण देते. आणि ज्या विद्यार्थ्यांनी पदवी पुर्ण केली आहे अथवा जे विद्यार्थी पदवीच्या अंतिम वर्षाला आहे असे विद्यार्थी सदर संस्थेकडून मोफत प्रशिक्षणासाठी घेण्यात येणारी चाळणी परीक्षा देऊ शकतात. तसेच विद्यार्थ्यांनी अधिकाधिक लाभ घेण्यासाठी दि. १९ जुन २०२१ ते १८ जुलै २०२१ दरम्यान ऑनलाईन नोंदणीसाठी तथा अधिक माहीतीसाठी www.svpias.com या संकेतस्थळावर भेट देण्याचे सुचित केले आहे. आपल्या माहीतीसाठी व संदर्भासाठी वरील पत्राची प्रत जोडलेली आहे.

तेव्हा, आपल्या महाविद्यालयातील/ परिसंस्थेतील/ प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी अधिकाधिक लाभ घेण्यासाठी दि. १९ जुन २०२१ ते १८ जुलै २०२१ दरम्यान वरील संस्थेच्या ऑनलाईन नोंदणीसाठी तथा अधिक माहीतीसाठी www.svpias.com भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

कक्षअधिकारी
विकास विभाग

सोबत:- वरील प्रमाणे